श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

तांबे, पितळ, स्टील वस्तू जाहिर लिलावात सहभागी होणेसाठी अर्ज

दिनांक /०६/२०२४

प्रति,

कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि.सोलापूर.

विषयः- तांबे, पितळ, स्टील वस्तू जाहिर लिलाव २०२४.

अर्जदाराचे पूर्ण नाव:- ----------------------------------------------------------------

पूर्ण पत्ता:- ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

मोबाईल क्रं.:- ----------------------------------------------------------------

महोदय,

वरील विषयात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, आपलेकडील दि.२५/०६/२०२४ रोजीचे वर्तमानपत्रातील व मंदिर समितीच्या संकेतस्थळावरील मंदिर समितीच्या तांबे, पितळ, स्टील वस्तूच्या जाहिर लिलावाची जाहिरात वाचली असून मला सदर लिलावात सहभाग घेण्याची इच्छा आहे. त्यासाठी अनामत रक्कम रू.१०,०००/- रोखीने / डी.डी. ने भरलेली आहे. सदरच्या लिलावाबाबतच्या मंदिरे समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत व त्याचे मी तंतोतंत पालन करीन.

१) फॉर्म फी व अनामत रक्कम (सोबत मुळ डी.डी. किंवा रोख रक्कम मंदिर समितीकडे भरणा केलेली पावती जोडली आहे.)

२) सोबत ओळखीचा पूरावा म्हणून ---------------------------------ची छायांकित प्रत जोडली आहे.

३) सोबत रहिवासाचा पूरावा म्हणून ---------------------------------ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

२/- तांबे, पितळ, स्टील वस्तू खरेदीचा माझा दर मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ. क्र. | मालाचा तपशिल | किमान बोलीची किंमत (रू.) प्रति किलो (जीएसटी वगळून) | ठेकेदाराने खरेदीसाठी नमुद केलेली जास्तीतजास्त किंमत (रू.) प्रति किलो (जीएसटी वगळून) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ०१ | तांबे वस्तू | ७५० | |
| ०२ | पितळ वस्तू | ५०० | |
| ०३ | स्टील वस्तू | ६० | |

सदरच्या मी नमुद केलेल्या दराने उक्त वस्तू खरेदी करण्यास बांधील राहील.

आपला विश्वासू,

(नाव व सही)

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**
**तांबे, पितळ, स्टील वस्तू साहित्य जाहीर लिलाव**

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१) विक्री करावयाच्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | विक्रीची संख्या (किलो) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | तांबे वस्तू (नक्षीची ताटे, विनानक्षीची ताटे, तांबे, ग्लास, लहान कुंड, निरंजन व इतर अनुषंगीक) | ५५० |
| २ | पितळ वस्तू (लहान व मोठी घंटी, समई, नक्षीची ताटे, विनानक्षीची ताटे, टाळ, कळस व इतर अनुषंगीक) | ३७५ |
| ३ | स्टील वस्तू (लहान-मोठे डब्बे, लहान-मोठे ताटे, लहान-मोठी डिझाईनच्या प्लेट, लहाने-मोठी वाटी, ग्लास, चमचे, लहान-मोठ्या बादल्या, कुंड व इतर अनुषंगीक) | ८०० |

२) नमूना लिलाव अर्ज कार्यालयीन वेळेत श्री. तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील.

३) सदर खरेदीवर नियमानुसार १८% जीएसटी आकारला जाईल.

४) लिलाव फॉर्म भरून दि.०१/०७/२०२४ सायं.५.०० वाजेपर्यंत श्री. तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. लिलाव अर्ज समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

५) लिलाव अर्जासोबत फॉर्म फी रू.५००/- व अनामत रक्कम रू.१०,०००/- चा कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या नावाचा डी.डी. किंवा रोखीने रक्कम जमा केल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे. त्यामध्ये फॉर्म फी विनापरतावा व अनामत रक्कम परतावा असेल.

६) लिलाव अर्ज, फॉर्म फी व अनामत रकमेचा डि.डी. /रोखीची पावती सिलबंद पाकिटात दि.०१/०७/२०२४ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. सिलबंद पाकिटावर ठेकेदाराचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्र. व तांबे, पितळ, स्टील वस्तू जाहीर लिलाव फॉर्म असे नमुद करणे आवश्यक आहे.

७) सिलबंद लिलाव अर्ज दि.०२/०७/२०२४ रोजी दु.१२.०० वा. श्री. तुकाराम भवन, पंढरपूर येथे सर्व ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या ठेकेदारांना त्यावेळी इतर ठेकेदाराने नमुद केलेल्या दरांपेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या ठेकेदाराने जास्तीत जास्त दर नमुद केला असेल किंवा जास्तीतजास्त दर बोलला असेल त्याच्या नावे लिलाव मंजुर करण्यात येईल.

८) ज्याचे नावे लिलाव मंजुर होईल. त्यांनी लिलावाची होणारी संपूर्ण रक्कम ३ दिवसात भरणा करून माल उचलणे आवश्यक आहे. मुदतीत रक्कम भरली नाही अथवा माल उचलला नाही तर सदरचा मंजुर लिलाव रद्द केला जाईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

९) कोणताही अर्ज अगर सर्वच अर्ज कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिर समितीने राखून ठेवले आहेत.

१०) लिलावातील माल महावस्त्र कार्यालय, तिसरा मजला, श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर या ठिकाणी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

११) सदरचे साहित्य लिलाव धारकांने स्वतःचे मजुर व वाहन लावून मंदिर समितीचे प्रतिनिधी समोर वजन करून उचलणेचे आहे.

१२) नमुन्यातील अर्जासोबत ओळखीचा पूरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/ आधारकार्ड/ ड्रायव्हींग लायसंन्स/ राष्ट्रीय बॅकेचे पासबुक/ पॅनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच लिलावाचे वेळी मुळ ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. रहिवासी पुराव्यासाठी स्वतःचे नावाचे लाईट बील किंवा फोन बीलाची एक प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३) मंदिर समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते लिलावधारकांस बंधनकारक राहील.

१४) सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१५) प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता लिलाव कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

-------‘‘-------